क्रमांक : एलआरएफ-२६०१/२५०/प्र.क्र.६१८/ज-३
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई - ३२
दिनांक :- ०३ ऑक्टोबर, २००३

**विषय :-** जमीन - मुंबई उपनगर जिल्हा
मौ.असल्फा न.भू.क्र. ३५१ पै मधील जमीन नशेमन एज्युकेशन अँड वेल्फेअर सोसायटी या संस्थेस प्राथमिक शाळेसाठी मंजूर करणेबाबत.

**ज्ञापन :-**

जिल्हाधिकारी मुंबई उपनगर जिल्हा यांना वरील विषयासंबंधीच्या त्यांच्या क्रमांक संकार्या-२५/३२/कावि-५५९/२०००, दि. १८.१२.२००२ व क्रमांक-मौकार्या-२/डी/कावि-४३३/२००१ दिनांक १७/७/२००३ च्या पत्रास अनुलक्षून विज्ञापनपूर्वक कळविण्यात येते की, मुंबई महानगर पालिकेच्या मंजूर विकास आराखडयात प्राथमिक शाळा, खेळाचे मैदान व दवाखाना यासाठी आरक्षित असलेल्या मौजे असल्फा येथील न.भू.क्र.३५१ पै मधील सोबतच्या नकाशात ए-बी-जी-एच या अक्षराने दर्शविलेली ७११.७ चौ.मी. जमीन नशेमन एज्युकेशन अँड वेल्फेअर सोसायटी या संस्थेस प्राथमिक शाळेसाठी महाराष्ट्र जमीन महसूल सरकारी जमिनींचे वितरण नियम १९७१ मधील नियम ५ब ६ आणि शासन परिपत्रक महसूल व वन विभाग क्रमांक एलआरएफ १०८३/१४९६/२७७०/ग-६, दिनांक १२/५/८४ मधील तरतुदीनुसार सदर जमिनीची नगर रचना व मूल्यनिर्धारण विभागामार्फत निश्चित करण्यात येणा-या दिनांक १/२/७६ रोजीच्या बाजारभावाच्या किंमतीच्या २५% इतकी कब्जेहक्काची सवलतीची किंमत वसूल करून तसेच शासन परिपत्रक महसूल व वन विभाग क्रमांक १०८३/७२२३४/प्र.क्र.३४७८/ग-६, दिनांक ८/२/१९८३ मधील सर्व अटींच्या पूर्ततेच्या अधिन राहून व खालील विशेष अटींवर आणि याबाबत जिल्हाधिकारी यांना योग्य वाटतील अशा अन्य अतिरिक्त अटी/शर्तीवर देण्यास शासन मंजुरी देत आहे.

**अट:-** नशेमन एज्युकेशन अँड वेल्फेअर सोसायटी या संस्थेस जमीन मंजुरी आदेशाच्या दिनांकापासून ३ वर्षांच्या कालावधीत संबंधित प्राधिकरणाकडून प्राथमिक शाळेस मंजुरी मिळविणे अनिवार्य राहील. अन्यथा त्या प्रयोजनार्थ दिलेले जमीन मंजुरीचे आदेश निष्प्रभ ठरतील.

२. सोबत जमिनीचा नकाशा व प्रकरणाची १ (एक) संचिका परत करण्यात येत आहे.

३. हे ज्ञापन नगर विकास विभागाच्या आणि वित्त विभागाच्या सहमतीने (वित्त विभाग अनौपचारिक संदर्भ क्र. प्र.क्र.१३८/०३/व्यय-९,दिनांक २७.९.२००३ ) निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(विजय पायकवाड)
कार्यासन अधिकारी,
महसूल व वन विभाग

प्रति,
जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा, प्रशासकीय इमारत, वांद्रे (पूर्व), मुंबई - ५१.

प्रतिलिपी :-
१) आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई.
२) उपसंचालक, भूमी अभिलेख, कोकण विभाग, मुंबई.
३) महालेखापाल, १ महाराष्ट्र राज्य, मुंबई (लेखापरिक्षा).
४) महालेखापाल, १ महाराष्ट्र राज्य मुंबई (लेखा व अनुज्ञेयता)
५) सहाय्यक संचालक, नगर रचना व मुल्यनिर्धारण, मुंबई.
६) नगर विकास विभाग ,मंत्रालय ,मुंबई-३२.
७) वित्त विभाग, (व्यय -९) मंत्रालय, मुंबई - ३२
८) शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई ३२
९) आयुक्त बृहन्मुंबई महानगरपालिका ,मुंबई-१
१०) निवडनस्ती, ज-३ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२

जिल्हाधिकारी मुंबई
उपनगर जिल्हा यांचे कार्यालय
दिनांक : 8 OCT 2003
आवक क्र.:-
22234
११७
लिपिक [illegible] [illegible]

ORDER [illegible] C:\WINDOWS\Desktop\[illegible]\LETTER [illegible]

Scanned by CamScanner

केवल आदाता के खाते में
Payee's Account only

Not over Rs.******62273.75 01/12/2003

PAY COLLECTOR MUMBAI SUBURBAN DISTRICT ******************************* को या आदेशानुसार OR ORDER

रुपये RUPEES ********************************
Sixty Two Thousand Two Hundred
Seventy Three and Paise Seventy Five Only. अदा करें

रु. Rs. ******62273.75

जारी करने की तारीख से छः मास के लिए वैध
VALID FOR SIX MONTHS FROM THE DATE OF ISSUE

यूनियन बैंक ऑफ इंडिया 030229
कुर्ला, मुंबई-400 086 (महाराष्ट्र)
UNION BANK OF INDIA
KURLA, MUMBAI (MAHARASHTRA)

कृते यूनियन बैंक ऑफ इंडिया For Union Bank of India

प्राधिकृत हस्ताक्षर Authorised Signatories

⑈038229⑈ 400026029⑆ 17

Scanned by CamScanner

# जिल्हाधिकारी मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय

**प्रशासकिय इमारत, १० वा मजला, सरकारी वसाहत, बांद्रा (पूर्व) मुंबई-४०० ०५१**

---

क्र. कार्या-२डी/कावि-४१३
दिनांक : २/१२/२००३

वाचले :- १) शासन, महसूल व वन विभाग क्र. एसआरएफ-२९०१/२५०/प्र.क्र. ६१८/ज-३ दि. ३/१०/२००३
२) या कार्यालयाचे सम क्रमांक दि. १३/१०/२००३ चे पत्र.
३) नशेमन एज्युकेशन अँण्ड वेलफेअर सोसायटी यांचे पत्र क्र. २०१/०३ दि. १/१२/२००३

**आदेश:-**

नशेमन एज्यकेशनल अँण्ड वेलफेअर सोसायटी या संस्थेस प्राथमिक शाळेसाठी मौजे अगल्फा येथील सीटीएस नं. ३५१ पैकी सोबतच्या नकाशात ए-बी-जी-एच या आद्याक्षराने दर्शविलेली ७११.७० चौ.मी. जमिन महाराष्ट्र जमिन महसूल (सरकारी जमिनीचे वितरण) नियम १९७१ मधील नियम ५ व ६ आणि शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग क्र. एसआरएफ १०८३/१४९६/३७००/ग-६ दि. ११/५/८४ मधील तरतूदीनुसार सदर जमिनीची नगर रचना व मुल्यनिर्धारण विभागामार्फत मुल्यांकन निश्चित केल्या जाणाऱ्या दि. १/२/७६ रोजीच्या बाजारभावाच्या किंमतीच्या २५% इतकी कब्जेहक्काची सवलतीची किंमत वसूल करुन तसेच शासन परिपत्रक महसूल व वन विभाग क्र. १०८३/७११३४/प्र.क्र. ३४७८/ग-१ दि.८/२/१९८३ मधील सर्व अटींच्या पुर्ततेच्या अधिन राहून व खालील विशेष अटीवर महसूल व वन विभागाकडील ज्ञापन क्र एलआरएफ-२९०१/२५०/प्र.क्र. ६१८/ज-३ दि. ३/१०/२००३ अन्वये खालील अटी/शर्तीस अधिन राहून मंजूर करण्यात येत आहे.

१) दि. १/२/१९७६ रोजीच्या बाजारभावाच्या किंमतीच्या २५% इतकी कब्जेहक्काची सवलतीची तात्पुरती रक्कम रु. ६२२७३.७५ पे ऑर्डरने जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे नांवे भरणा करावी (सदरची रक्कम संस्थेने पे ऑर्डर क्र. ०३८२२९ दि. १/१२/२००३ अन्वये भरणा केली आहे.)

२) प्रस्तुत प्रकरणांत नगर रचना व मुल्यनिर्धारण विभागामार्फत दि. १/२/१९७६ चे मुल्यांकन निश्चित करण्यांत येत आहे. मुल्यांकन निश्चित झाल्यानंतर तो अंतिमरित्या ठरविण्यांत येणारी कब्जेहक्काची किंमत विना तक्रार मान्य करण्यांत येईल व त्याप्रमाणे देय ठरणारी फरकाची रक्कम जमिनीचा ताबा घेतल्यापासून रक्कमेचा पुर्ण भरणा होईपर्यंतच्या अवधीसाठी त्या रक्कमेवर प्रचलित दरानुसार देय होणारे व्याज लावून तत्संबंधीच्या सुचना जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचेकडून मिळाल्यापासून एक महिन्यात एक रकमी भरणा करेल असे हमीपत्र संस्थेने सादर करावे.

३) नशेमन एज्यकेशनल अँण्ड वेलफेअर सोसायटी या संस्थेस जमिन मंजुरीच्या आदेशाच्या दिनांकापासून ३ वर्षाच्या कालावधीत संबंधीत प्राधिकरणाकडून प्राथमिक शाळेस मंजूरी मिळविणे अनिवार्य राहील अन्यथा त्या प्रयोजनार्थ दिलेले जमिन मंजुरीचे आदेश निष्प्रभ ठरतील.

४) सदर जमिनीचा वापर प्राथमिक शाळा या प्रयोजनासाठीच करावा लागेल. इतर प्रयोजनासाठी वापर करता येणार नाही.

Scanned by CamScanner

५) शासन मान्य करील अशा अटी/शर्तीचा करारनामा करणेस संस्थेस बंधनकारक राहील.

६) जमिन भोगवटादार वर्ग-२ म्हणून देण्यात येत असल्याने विक्री हस्तांतरण जिल्हाधिकारी यांचे परवानगीशिवाय करता येणार नाही.

सही/-
जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा

प्रति,

अध्यक्ष/सचिव,
नवोगन एज्युकेशनल ॲण्ड वेलफेअर सोसायटी,
७/१२, जी.एम. कॉलनी,
लिटील फ्लॉवर स्कुल मागे,
अमृत नगर घाटकोपर(प.),
मुंबई - ४०० ०८६

प्रत :

१) नगर भूमापन अधिकारी, घाटकोपर यांचेकडे रवाना.

२/- त्यांनी प्रश्नांकित जमिनीचा ताबा संस्थेस तहसिलदार, कुर्ला यांचे मंडळ अधिकारी घाटकोपर यांचे समक्ष देऊन नगर भूमापन अभिलेखात योग्य तो फेरफार करुन त्यांच्या उताऱ्यासह ताबा पावती व नकाशाच्या प्रतीसह अहवाल सादर करावा

२) तहसिलदार कुर्ला यांचेकडे योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

२/- त्यांनी संबंधीत मंडळ अधिकारी घाटकोपर यांना जागेचा ताबा संस्थेस देतेवेळी हजर राहणेच्या सुचना द्याव्यात व जमिनीचा ताबा संस्थेस दिल्यावर गांवच्या अभिलेखात योग्य तो फेरफार करुन पुर्तता अहवाल सादर करावा

३) मा. प्रधान सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय यांना त्यांचेकडील ज्ञापन क्र. एलआरएफ-२६०१/२५०/प्र.क्र. ६१८/ज-३ दि. ३/१०/२००३ च्या अनुषंगाने माहितीसाठी सविनय सादर.

स्वाक्ष परिवर जिल्हाधिकारी यांची सही असे.

जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा करिता.

O/C.

Scanned by CamScanner

क्रमांक : एलआरए २६०१/२५०/प्र.क्र.६१८/ज-३
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई - ३२
दिनांक :- ८/१/०४

विषय :- जमीन - मुंबई उपनगर जिल्हा
मौ.असल्फा न.भू.क्र. ३५१ पै
नशेमन अेज्युकेशन अँड वेल्फर सोसायटी या संस्थेस प्राथमिक
शाळेसाठी मंजूर करण्यात आलेल्या जमिनीस पोहोच
रस्त्यासाठी जमीन मंजूर करणेबाबत.

**ज्ञापन :-**

जिल्हाधिकारी मुंबई उपनगर जिल्हा यांना वरील विषयासंबंधीच्या समक्रमांकाच्या दि.३.१०.२००३ च्या शासन ज्ञापनाच्या अनुषंगाने विशषीपूर्वक कळविण्यात देते की नशेमन अेज्युकेशन अँड वेल्फअर सोसायटी या संस्थेस प्राथमिक शाळेकरीता अशा शैक्षणिक प्रयोजनाकरीता समक्रमांकाच्या दि.३.१०.२००३ च्या शासन ज्ञापनान्वये मंजूर करण्यात आलेल्या मौजे असल्फा न.भू.क्र.३५१ पै मधील ७११.७ चौ.मी.जमिनीत येजा करण्याकरीता पोहोच रस्त्यासाठी या मंजूर जमीन लगत असलेल्या मौ. किरोळ येथील नभूक्र १७४ पै मधील ( नकाशात एच.जी.मी.डी या अक्षराने दर्शविलेली ) सुमारे १०० चौ.मी. ( प्रत्यक्षात मोजणीअंती भरणारे क्षेत्र ) जमीन महाराष्ट्र जमीन महसूल ( सरकारी जमिनीचे वितरण ) नियम १९७१ मधील तरतुदीनुसार सदर जमिनीची आजच्या बाजारभावाची तात्पुरती किंमत प्र.चौ.मी. रु.८०००/- इतकी मानून या दराप्रमाणे जमिनीची तात्पुरती कब्जेहक्काची किंमत वसूल करुन घेऊन नेहमीच्या अटी व शर्तीवर आणि खालील अतिरिक्त अटींवर मंजूर करण्यास शासन मंजुरी देत आहे.

अटी :-१) संस्थेस मंजूर जमिनीचा वापर रस्त्याखेरीज अन्य प्रयोजनाच्या बांधकामासाठी करता येणार नाही.

२) संस्थेने मंजूर जमिनीवर तयार केलेला रस्ता सर्वांना वापरास खुला असेल त्या रस्त्यावर संस्था हक्क बजावणार नाही.

३) संस्थेस शैक्षणिक प्रयोजनाकरीता जमीन मंजूर करण्यात आलेल्या दि.३.१०.२००२ च्या ज्ञापनातील अतिरिक्त अट बंधनकारक असेल.

४) मंजूर जमिनीची आजच्या बाजारभावाची किंमत सहाय्यक संचालक नगर रचना व मूल्य निर्धारण विभागाकडून निर्धारीत करुन घेण्यात यावी. जर तात्पुरत्या रकमेपेक्षा अंतीम किंमत अधिक भरल्यास फरकाची रक्कम प्रचलित धोरणानुसार व्याजासह वसूल करण्यात यावी.

३. सोबत संस्थेस रस्त्यासाठी प्रस्तावित करण्यात आलेल्या जमिनीचा नकाशा उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

४. हे ज्ञापन नगर विकास विभागाच्या सहमतीने आणि वित्त विभागाने त्यांच्या क्र. विअप्र १०९२ /प्र.क्र. १४८ /विनियम, दि.४.८.९२ च्या निर्णयान्वये या विभागास प्रदान केलेल्या वित्तीय अधिकाराचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(विजय पाचकवडे)
कार्यासन अधिकारी,
महसूल व वन विभाग

प्रति,

जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा, प्रशासकीय इमारत, वांद्रे (पूर्व), मुंबई - ५१

जिल्हाधिकारी (उप)
उपनगर जिल्हा यांचे कार्यालय
दिनांक 9 JAN 2004
आवक क्र. 803

ORDER 9a 1-3 Jwpp.twp C:\WINDOWS\...\Kokade\LETTER - 397

Scanned by CamScanner

जिल्हाधिकारी मुंबई उपनगर जिल्हा
5 JUN 2004
दिनांक :-
आवक क्र.:- 1/4-74
विभाग :- III


क्रमांक : एलआरएफ.२६०१/२५०/प्र.क्र.६१८/ज-३
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई - ३२
दिनांक :- ४ जून, २००४

**विषय :- जमीन - मुंबई उपनगर जिल्हा**
मौ.असल्फा न.भू.क्र. ३५१ पै नशेमन एज्युकेशनल अँड वेल्फर सोसायटी या संस्थेस प्राथमिक शाळेसाठी मंजूर करण्यात आलेल्या जमिनीस पोहोच रस्त्यासाठी मंजूर करण्यात आलेल्या मौजे किरोळ येथील नभूक्र १७४ पै मधील जमिनीची सवलतीची कब्जेहक्काची किंमत वसूल करण्याबाबत.

**ज्ञापन :-**

नशेमन एज्युकेशनल अँड वेल्फअर सोसायटी या संस्थेस प्राथमिक शाळे.या ... शैक्षणिक प्रयोजनाकरीता समक्रमांकाच्या दि.३.१०.२००३ च्या शासन ज्ञापनान्वये मंजूर करण्यात आलेल्या मौजे असल्फा न.भू.क्र.३५१ पै मधील ७११.७ चौ.मी.जमिनीत येजा करण्याकरीता पोहोच रस्त्यासाठी या मंजूर जमीनीलगत असलेल्या मौ. किरोळ येथील नभूक्र १७४ पै मधील सुमारे १०० चौ.मी. जमीन महाराष्ट्र जमीन महसूल ( सरकारी जमिनीचे वितरण ) नियम १९७१ मधील तरतुदीनुसार सदर जमिनीची आजच्या बाजारभावाची तात्पुरती किंमत प्र.चौ.मी. रु.८०००/- इतकी मानून या दराप्रमाणे जमिनीची तात्पुरती कब्जेहक्काची किंमत वसूल करुन घेऊन नेहमीच्या अटी व शर्तीवर आणि अतिरिक्त अटीवर समक्रमांकाच्या दि. ८ जानेवारी २००४ च्या शासन ज्ञापनाद्वारे मंजूर करण्यात आली आहे. तथापि सदर जमिनीची संस्थेकडून आजच्याबाजारभावाची कब्जेहक्काची किंमत वसूल करण्यासंदर्भात संस्थेने शासनाकडे दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने फेरविचार करुन संस्थेस प्राथमिक शाळेच्या रस्त्यासाठी मंजूर करण्यात आलेली मौजे किरोळ येथील नभूक्र १७४ पै मधील सुमारे १०० चौ.मी. जमिनीची कब्जेहक्काची किंमत ही आजच्या बाजारभावाने वसूल करण्याऐवजी महाराष्ट्र जमीन महसूल सरकारी जमिनीचे वितरण नियम १९७१ मधील नियम ५व ६ आणि शासन परिपत्रक महसूल व वन विभाग क्रमांक एलआरएफ १०८३/१४९६/३७००/ग-६, दिनांक ११/५/८४ मधील तरतुदीनुसार सदर जमिनीची नगर रचना व मूल्यनिर्धारण विभागामार्फत निश्चित केल्या जाणा-या दिनांक १/१/७६ रोजीच्या बाजारभावाच्या किमतीच्या २५% इतकी कब्जेहक्काची सवलतीची किंमत वसूल करण्यास शासन मंजूरी देत आहे.

८. हे ज्ञापन वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ३१९ /०४ / व्यय-९, दि.२६.३.२००४ अन्वये मिळालेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(विजय पाचकवडे)
कार्यासन अधिकारी,
महसूल व वन विभाग

प्रति,
जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा, प्रशासकीय इमारत, वांद्रे (पूर्व), मुंबई - ५१



Scanned by CamScanner

# जिल्हाधिकारी मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय

**प्रशासकिय इमारत, १० वा मजला, सरकारी वसाहत, बांद्रा (पूर्व) मुंबई-४०० ०५१**

क्र. कार्या-२डी/एलएनडी/कावि-४३३/२००४
दिनांक :१७/६/२००४

वाचले :- १) महाराष्ट्र शासन महसूल व वन विभागाकडील शापन क्र. एसआरए -२६०१/२५०/प्र.क्र. ६१८/ज-३ दि.३/१०/२००३ , ८/१/२००४ व ८/६/२००४

२) या कार्यालयाचे सम क्रमांक सी/कार्या/२डी/कावि/४३३/०१ दि. १३/१/२००४ व १०/६/२००४ चे पत्र.

३) नशेमन एज्युकेशन अेण्ड वेलफेअर सोसायटी यांचेकडील दि. ११/६/२००४ चे पत्र.

**<u>आदेश:-</u>**

नशेमन एज्युकेशनल अेण्ड वेलफेअर सोसायटी या संस्थेस प्राथमिक शाळा या शैक्षणीक प्रयोजनकरीता महसूल व वन विभागाकडील शापन क्र. एसआरए २६०१/२५०/प्र.क्र. ६१८/ज-३ दि. ३/१०/२००३ अन्वये मंजूर करण्यांत आलेल्या मोजे असल्फा न.भू.क्र. ३५१ पैकी मधील ७११.७० चौमी जमिनीत येजा करण्याकरीता पोहोच रस्त्यासाठी या मंजुर जमिनीलगत ~~पोहोच रस्त्यासाठी या मंजूर जमिनीलगत~~ असलेल्या मोजे किरोळ येथील न.भू.क्र. १७४ पै मधील सुमारे १०० चौ.मी. जमिन महाराष्ट्र जमिन महसूल (सरकारी जमिनीचे वितरण) नियम १९७१ मधील नियम ५ व ६ आणि शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग क्र. एसआरएफ १०८३/१४९६/३७००/ग-६ दि. ११/५/८४ मधील तरतूदीनुसार सदर जमिनीची नगर रचना व मुल्यनिर्धारण विभागामार्फत मुल्यांकन निश्चित केल्या जाणाऱ्या दि. १/२/७६ रोजीच्या बाजारभावाच्या किमतीच्या २५% इतकी कब्जेहक्काची सवलतीची किंमत वसूल करुन घेउन नेहमीच्या अटी व शर्तीवर आणि खालील अतिरिक्त अटीवर शासन महसूल व वन विभागाकडील शापन दि. ८/१/२००४ व ८/६/२००४ अन्वये मंजूर करण्यांत येत आहे.

१) दि. १/२/१९७६ रोजीच्या बाजारभावाच्या किमतीच्या २५% इतकी कब्जेहक्काची सवलतीची तात्पुरती रक्कम रु. ८७५०/-(रु. आठ हजार सातशे पन्नास मात्र) पे ऑर्डरने जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे नांवे भरणा करावी (सदरची रक्कम पे ऑर्डर क्र. ०३९५३८ दि. ११/६/२००४ युनियन बेंक ऑफ इंडीया अन्वये भरणा केली आहे.)

२) प्रस्तुत प्रकरणांत नगर रचना व मुल्यनिर्धारण विभागामार्फत दि. १/२/१९७६ चे मुल्यांकन निश्चित झाल्यानंतर अंतिमरित्या ठरविण्यांत येणारी कब्जेहक्काची किंमत विना तक्रार मान्य करण्यांत येईल व त्याप्रमाणे देय ठरणारी फरकाची रक्कम जमिनीचा ताबा घेतल्यापासून रक्कमेचा पुर्ण भरणा होईपर्यंतच्या अवधीसाठी त्या रक्कमेवर प्रचलित दरानुसार देय होणारे व्याज लावून तत्संबंधीच्या सुचना जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचेकडून मिळाल्यापासून एक महिन्यात एक रकमी भरणा करेल असे हमीपत्र संस्थेने सादर करावे.

३) संस्थेस मंजूर जमिनीचा वापर रस्त्याखेरीज अन्य प्रयोजनाच्या बांधकामासाठी करता येणार नाही.

D:\Desk IID Grant of land order 307. wp

Scanned by CamScanner

४) संस्थेने मंजूर जमिनीवर तयार केलेला रस्ता सर्वांना वापरास खुला असेल व त्या रस्त्यावर संस्था हक्क बजावणार नाही.

५) संस्थेस शैक्षणिक प्रयोजनाकरीता जमिन मंजूर करण्यात आलेल्या दि. ३/१०/२००२ च्या ज्ञापनातील अतिरिक्त अटी व य कार्यालयाचे दि. ३/१२/२००३ च्या आदेशातील अटी बंधनकारक असेल.

६) जमिन भोगवटादार वर्ग-२ म्हणून देण्यांत येत असून विक्री हस्तांतरण जिल्हाधिकारी यांचे परवानगीशिवाय करता येणार नाही.

सही/-
जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा

प्रति,
अध्यक्ष/सचिव,
नशेमन एज्युकेशनल अँण्ड वेलफेअर सोसायटी,
७/१२, जी.एम. कॉलनी,
लिटील फ्लॉवर स्कुल मागे,
अमृत नगर घाटकोपर(प.),
मुंबई - ४०० ०८६

प्रत :

१) नगर भूमापन अधिकारी, घाटकोपर यांचेकडे रवाना.
२/- त्यांनी प्रश्नांकित जमिनीचा ताबा संस्थेस तहसिलदार, कुर्ला यांचे मंडळ अधिकारी घाटकोपर यांचे समक्ष देऊन नगर भूमापन अभिलेखात योग्य तो फेरफार करुन त्यांच्या उताऱ्यासह ताबा पावती व नकाशाच्या प्रतीसह अहवाल सादर करावा

२) तहसिलदार कुर्ला यांचेकडे योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.
२/- त्यांनी संबंधीत मंडळ अधिकारी घाटकोपर यांना जागेचा ताबा संस्थेस देतेवेळी हजर राहणेच्या सुचना द्याव्यात व जमिनीचा ताबा संस्थेस दिल्यावर गांवच्या अभिलेखात योग्य तो फेरफार करुन पुर्तता अहवाल सादर करावा

३) मा. प्रधान सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय यंना त्यांचेकडील ज्ञापन क्र. एलआरएफ-२६०१/२५०/प्र.क्र. ६१८/ज-३ दि. ८/१/२००४ च्या अनुषंगाने माहितीसाठी सविनय सादर.

स्थळ प्रतिवर जिल्हाधिकारी याची सही असे.

15/6/04
जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा करिता.

Scanned by CamScanner